ePaper

“...तर देवेंद्र फडणवीसांनी राजीनामा द्यायलाच हवा”: सुषमा अंधारे

वर्ष - 6 । अंक - 329 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी झेडपी कर्मचारी एकवटले
- वाशीम जिल्ह्यातील काही भागात गारपिटीचा तडाखा
- ममता-अखिलेश यादव यांनी स्थापन केली नवी आघाडी

www.mahaenews.com | शनिवार , दि. 18 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

शिंदे- फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

पीएमएपी भाडेवाढ नाही !

» पुणे, पिंपरी-चिंचवडमधील सामान्य प्रवशांना दिलासा : ‘पीएमआरडीए’सुद्धा उचलणार भार

। पुणे। महाईन्यूज ।

पुण्यातील पीएमपीएमएलची बससेवा ही अतिशय महत्त्वाची आहे. ही बससेवा केवळ पुणेच नव्हे तर पिंपरी चिंचवड आणि पीएमआरडीए क्षेत्रातही कार्यरत आहे. २००४ पासून पीएमपीएमएलची भाडेवाढ न झाल्याने मोठा आर्थिक भुर्दंड पीएमपीएमएला सहन करावा लागत होता. मात्र, तरीही सामान्य प्रवाशांसाठी भाडेवाढ न करण्याचा निर्णय राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने घेतला आहे.

पीएमपपीएमएलचा आर्थिक ताण कमी करण्यासाठी पुणे महापालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका आपल्या क्षेत्रातील बससेवेनुसार तूट देत होती. पण तरीही पीएमपीएमएलवरील ताण कमी होत नाही. त्यामुळे आता यापुढे पीएमआरडीएने देखील यात आपला भाग उचलून पीएमपीएमएलवरील ताण कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी पीएमआरडीएचे आयुक्त हे पीएमपीएमएलचे संचालक म्हणून काम पाहणार आहेत.

पुणे महापालिकेमार्फत स्वतःच्या मालकीच्या घरात राहत असल्यास घरपट्टीमध्ये ४० टक्के सवलत मिळत होती. ही सवलत पुन्हा सुरू करण्याबाबत पुणेकर नागरिकांची असलेली मागणी लक्षात घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज विधान भवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून पुढील मंत्रिमंडळ बैठकीत सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचा सूचना देण्यात आल्या.

यावेळी आमदार माधुरी मिसाळ,आमदार भीमराव तापकीर, आमदार सिद्धार्थ शिरोळे, पुणे महानगरपालिका माजी महापौर मुरलीधर मोहोळ उपस्थित होते

राज्य शासनाने सन २०१९ मध्ये महानगरपालिकेचा ठराव विखंडन करुन घरपट्टीमध्ये देत असलेली ४० टक्के सवलत रद्द करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देश रद्द करून पुणे महापालिका हद्दीत मिळकत करात पुणेकरांना यापूर्वी देण्यात येणारी ४० टक्के सवलत पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी पुणेकर नागरिकांची मागणी आहे. याबाबत पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी पुढाकार घेऊन याबाबत सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

पुणेकर नागरिकांचा हा प्रश्न सोडविण्याबाबत राज्य शासन सकारात्मक आहे. लवकरच यावर अंतिम निर्णय होईल आणि पुणेकर नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी सांगितले. त्यांनी या प्रश्नाबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याने मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचे आभार मानले आहेत.

शास्तीकरसुद्धा होणार माफ...

» पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामांना लागू असलेला शास्तीकर माफ करण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी राज्य शासनाने घेतला होता. मात्र, पिंपरी चिंचवड प्रमाणे पुणे मनपा क्षेत्रातही अनाधिकृत बांधकामे असल्याने पुणे मनपा क्षेत्रासही शास्तीकर माफ व्हावा, अशी मागणी वारंवार होत होती. त्याला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी तत्वतः मान्यता दिली असून, यासंदर्भातील निर्णय आगामी मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात येणार आहे.

जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी झेडपी कर्मचारी एकवटले!

» सुमारे 16 हजार कर्मचारी सहभागी, शिक्षकांच्या आंदोलनामुळे मनपा शाळेवर परिणाम

। पुणे। महाईन्यूज ।

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी जिल्हा परिषदेशी संबंधित सर्व कर्मचारी संघटना यंदा पहिल्यांदाच एकवटल्या. यानुसार या सर्व संघटनांनी एकत्रित येऊन शुक्रवारी (ता.१७) जिल्हाधिकारी कार्यालयावर संयुक्त मोर्चा काढला. या मोर्चात जिल्हा परिषदेच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या १८ संघटनांनी एकत्रित येत एक वज्रमूठ बांधली. या मोर्चात

शहर व जिल्ह्यातील मिळून सुमारे १६ हजार कर्मचारी सहभागी झाले होते.

पुणे जिल्हा परिषदेच्या विविध विभागात मिळून अठरा कर्मचारी संघटना कार्यरत आहेत. यामध्ये लिपीकवर्गीय कर्मचारी संघटना, ग्रामसेवक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, परिचारिका (नर्सेस), आरोग्य कर्मचारी, शाखा अभियंता, परिचर (शिपाई), लेखा संघटना, रेखाचित्र संघटना, वाहनचालक, औषध निर्माण अधिकारी, विस्तार अधिकारी आदींसह विविध संघटनांचा समावेश आहे. या सर्व संघटनांचे पदाधिकारी आणि कर्मचारी आजच्या मोर्चात सहभागी झाले होते.

हा मोर्चा नवीन जिल्हा परिषदेच्या मुख्यालयापासून विधान भवन, साधू वासवानी चौक, सेंट्रल बिल्डींग मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर नेण्यात आला. कर्मचारी संघटनांच्या शिष्टमंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांना निवेदन देण्यात आले. या मोर्चाचे नियोजन ग्रामसेवक संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल कुंभार आणि जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष शेखर गायकवाड यांनी केले.

पुणेकरांचे 200 कोटी वाचणार

» या मोर्चात जिल्हा शिक्षक संघाचे जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब मारणे, केशव जाधव, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष गौतम कांबळे, शिक्षक समितीचे जिल्हा अध्यक्ष नंदकुमार होळकर, संतोष गदादे, शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेचे राज्य सह कार्यवाहक शिवाजी खांडेकर,लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेचे कोशाध्यक्ष उमाकांत सूर्यवंशी, नर्सेस संघटनेच्या राज्य अध्यक्षा मिनाक्षी मुदगूल, वैशाली दुर्गाडे, आरोग्य कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष दिलीप जगताप, ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत वाव्हळ, शाखा अभियंता संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब मखरे, परिचर संघटनेचे अध्यक्ष मयूर येक्के, लेखा संघटनेचे अध्यक्ष प्रकाश जामदार, रेखाचित्र संघटनेचे अध्यक्ष बंडोपंत शितोळे, वाहनचालक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश सणस, औषध निर्माण अधिकारी संघटनेचे अध्यक्ष प्रदीप गोलांडे आणि विस्तार अधिकारी संघटनेचे अध्यक्ष सुहास मोरे आदी सहभागी झाले होते.

मैदानी चाचणी संपली, लेखी परीक्षा दोन एप्रिलला

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

शहर पोलिस दलामध्ये भरती प्रक्रिया सुरू असून, इच्छुक उमेदवारांची मैदानी चाचणी शुक्रवारी पूर्ण झाली. त्यानंतर पोलिस शिपाई पदासाठी दोन एप्रिल रोजी लेखी परीक्षा होणार असल्याची माहिती पोलिस दलाकडून देण्यात आली. दरम्यान, या भरती प्रक्रियेत पहिल्यांदाच पाच तृतीयपंथीयांनी सहभाग नोंदविला आहे.

पोलिस भरतीसाठी 5 तृतीयपंथीयांचा सहभाग

» मुंबई उच्च न्यायालयाने ९ डिसेंबर २०२२ रोजी दिलेल्या आदेशानंतर तृतीयपंथीयांना पोलिस भरतीमध्ये पर्याय उपलब्ध करून देण्यात आला. पुणे शहर पोलिस दलामध्ये शिपाई आणि चालक भरतीसाठी नऊ तृतीयपंथीयांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. परंतु त्यापैकी एका महिला उमेदवाराने चुकून अर्ज भरला होता. तर, उर्वरित आठपैकी पाच तृतीयपंथीयांनी शुक्रवारी (ता. १७) मैदानी परीक्षेत सहभाग घेतल्याची माहिती पोलिस मुख्यालयाकडून देण्यात आली.

पुणे शहर पोलिस दलासाठी 'पोलिस भरती-२०२१' प्रक्रियेस तीन डिसेंबर रोजी प्रारंभ झाला. इच्छुक उमेदवारांच्या शैक्षणिक कागदपत्रांची पडताळणी पूर्ण करण्यात आली. त्यानंतर शारीरिक चाचणीसाठी मैदानी परीक्षा घेण्यात आली. यामध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची मेरीट यादी पाच-सहा दिवसांत जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती पोलिस मुख्यालयातील अधिकारी दशरथ हटकर यांनी दिली. दरम्यान, गृह विभागाच्या परिपत्रकानुसार पोलिस चालकपदाची लेखी परीक्षा २६ मार्च रोजी होणार आहे. तर, पोलिस शिपाई पदाची लेखी २ एप्रिल रोजी घेतली जाणार आहे.

पुण्यातील बांधकाम व्यावसायिकाच्या कार्यालयावर ईडीच्या पथकाचे छापे!

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुण्यातील एका नामांकित बांधकाम व्यावसायिकाच्या कार्यालयावर सक्त वसुली संचालनालयाकडून (ईडी) शुक्रवारी छापे टाकण्यात आले.कल्याणीनगर भागात एका बड्या बांधकाम व्यावसायिकाचे कार्यालय आहे. बांधकाम कंपनीच्या कार्यालयावर ईडीच्या पथकाने शुक्रवारी छापे टाकले. कार्यालयातून ईडीच्या पथकाने काही कागदपत्रे ताब्यात घेतली. ईडीच्या पथकाकडून बांधकाम व्यावसायिकाची चौकशी करण्यात आली.

हडपसर परिसरातील महंमदवाडी भागात बांधकाम व्यावसायिकाकडून बांधण्यात आलेल्या सोसायटीच्या परिसरात ही कारवाई करण्यात आली.ईडीच्या मुंबई पथकाने ही कारवाई केली. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात बांधकाम व्यावसायिकाची चौकशी करण्यात आली. सायंकाळपर्यंत बांधकाम व्यावसायिकाची चौकशी सुरू होती. बांधकाम व्यावसायिकाने पुण्यात येरवडा, कल्याणीनगर, एनआयबीएम रस्ता, वानवडी आदी भागात मोठे गृहप्रकल्प साकारले आहेत. दरम्यान, १० मार्च रोजी ईडीकडून पुण्यातील रोझरी स्कूलचे संचालक विनय आरहाना अटक करण्यात आली. कॉसमॉस बँकेची २० कोटी रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी आरहाना यांना अटक करण्यात आली होती. मुंबईतील विशेष न्यायालयाने आरहाना यांना २० मार्चपर्यंत ईडी कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील शवविच्छेदन विभागाचा विस्तार

» नऊ मृतदेहांचे शवविच्छेदन शक्य : मे 2023 पासून नवीन इमारत होणार कार्यान्वीत

। पिंपरी। महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात केवळ पिंपरी-चिंचवड शहर नाही तर आसपासचे चाकण, मावळ परिसरातूनही शवविच्छेदनासाठी मृतदेह येत असतात. त्यामुळे मरणानंतरही शवविच्छेदन अहवालासाठी मृतदेहांना वेटींग करावे लागत होते. ज्याचा मनस्ताप नातेवाईक तसेच पोलिसांनाही तपास विलंब होत होता. यावर अखेर तोडगा निघाला असून वायसीएम रुग्णालयातील शवविच्छेदन विभागाचा विस्तार होत असून नवीन शवविच्छेदन विभागात एका वेळी नऊ मृतदेहांचे शवविच्छेदन शक्य होणार आहे. मे 2023 पासून नवीन इमारत कार्यरत होणार आहे.

केवळ शवविच्छेदनच नाही तर या बरोबरच कोल्ड स्टोरेज आणि वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी गॅलरी, ग्रंथालय, सेमिनार हॉल, संग्रहालय अशा विविध सुविधा देखील नव्या इमारतीत असणार आहेत. शवविच्छेदन गृहात न्यायवैद्यक शास्त्राचे प्राध्यापक, सहायक प्राध्यापक आणि इतर स्टाफ देण्याची प्रकिया सुरु आहे. त्यांच्यासाठी नव्या इमारतीमध्ये स्वतंत्र दालने असणार आहेत. न्यायवैद्यक शास्त्रातील तज्ज्ञ देखील नेमले जाणार आहेत. कोल्ड स्टोरेज ची क्षमता 20 पेट्यांतून वाढवून ती 60 पेट्या एवढी केली जाणार आहे.

नव्या इमारतीत सहा डॉक्टर आणि 16 कर्मचारी असावेत. तसेच सध्या एक फॉरेन्सिक एक्सपर्ट असून चार फॉरेन्सिक एक्सपर्ट असावेत, अशी मागणी केली आहे. फोटोग्राफी, शस्त्र, विषबाधा या संबंधित सखोल माहिती असणारे संग्रहालय असेल. हे संग्रहालय सर्वसामान्य नागरिकांसाठी देखील खुले राहील. 60 विद्यार्थी क्षमतेचा सेमिनार हॉल असेल. तिथे वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सेमिनार होऊ शकतील.

सर्व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेले मिनी ऑपरेशन थिएटर असेल. या ऍडव्हान्स लर्निंग सेंटर मध्ये विद्यार्थी इन कॅमेरा आपल्या विषयाशी संबंधित शस्त्रक्रिया करू शकतील. नव्या इमारतीत कामकाज सुरु झाल्यानंतर जुन्या इमारतीमध्ये डी कंपोज बॉडी रूम बनविली जाणार आहे. रुग्णवाहिका आणि नातेवाईकांच्या वाहनांसाठी नव्या इमारतीत पार्किंगची सोय असेल.

उत्पन्न मिळणार

» कोल्ड स्टोरेज – 120 रुपये प्रति दिवस, मेडिकल कॉलेज – 1 लाख 25 हजार डिपॉझिट आणि 20 ते 40 हजार रुपये वार्षिक फी, हॉल, लर्निंग सेंटर भाडे तत्वावर दिले जाणार

बोऱ्हाडेवाडीतील निवास क्षेत्राच्या प्रस्तावाला अखेर गती

» आमदार महेश लांडगे यांची शिंदे-फडणवीस सरकारकडे मार्गी : लवकरच निर्णय होण्याची शक्यता

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत बोऱ्हाडेवाडीचा समावेश १९९७ मध्ये करण्यात आला. मात्र, अद्याप येथील जमीनी शेती क्षेत्र (ॲग्रिकल्चरल झोन) म्हणून कागदोपत्री नोंदीत आहेत. शहराचा विकास झपाट्याने होत असून, वाढत्या लोकसंख्येनुसार शेती क्षेत्राचे निवासी क्षेत्रात (आर झोन) मध्ये रुपांतर करण्याची आवश्यकता आहे, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत निवेदन देण्यात आले आहे.

त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेत आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली येणाऱ्या बोऱ्हाडेवाडी येथील दोनशे एकर क्षेत्र शेती विभागातील जमीन निवास क्षेत्रात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव महापालिका सर्वसाधारण सभेत सभा ठराव क्र. ५३३ दि. दि. २० ऑक्टोबर २००८ रोजी मंजूर करण्यात आला. त्यानंतर तसेच, सर्वसाधारण सभेत दि. २० नोव्हेंबर

२०१९ रोजी ठराव आणि उपसूचना मंजूर करण्यात आली. तसेच, दि. ४ मे २०२० रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार फेरबदल प्रस्ताव राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. गेल्या १६ वर्षांपासून हा प्रस्ताव राज्याच्या नगरविकास विभागाकडे प्रलंबित आहे.

बोऱ्हाडेवाडीच्या सभोवताली मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाले असताना मात्र, या भागाचा विकास झालेला नाही. कारण, शेती क्षेत्रात विविध विकास योजना राबवण्यात तांत्रिक अडचणी येत आहेत. हरित क्षेत्र असल्यामुळे या गावातील शेतकऱ्यांना बांधकाम करण्यासाठी महापालिका बांधकाम विभाग परवानगी देत नाही. मात्र, शिंदे-फडणवीस सरकारकडून स्थानिक भूमिपुत्रांना अपेक्षा आहेत, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

शिंदे-फडणवीस सरकार प्रश्न सोडवणार...

भोसरी विधानसभा मतदार संघाचा विचार करता, महापालिका हद्दीत समाविष्ट झालेली गावे २० वर्षे विकासापासून वंचित राहिली आहेत. तेथील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. २०१७ मध्ये महापालिकेत भारतीय जनता पार्टीची सत्ता आली. त्यानंतर समाविष्ट गावांच्या विकासाला चालना देण्यात आली. आगामी काळात समाविष्ट गावांना न्याय देण्याच्या हेतूने राज्य सरकारने बोऱ्हाडेवाडीतील हरित क्षेत्र निवासी करण्याबाबतचा गेल्या १६ वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी आम्ही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. निश्चितपणे हा विषय मार्गी लागेल, असा विश्वास वाटतो, अशी प्रतिक्रिया आमदार महेश लांडगे यांनी दिली.

संपादकीय

मिठाचा हट्टाग्रह!

मीठ आणि आपला जीवनव्यवहार यांचा अन्योन्य संबंध आहे. समाजव्यवहारात मिठावरून म्हणी, वाक्प्रचारही रुढ आहेत. 'खाल्ल्या मिठाला जागणे' असे आपण म्हणतो. मिठावरील कर कमी करावा या मागणीसाठी ब्रिटिश आमदनीत महात्मा गांधींनी प्रसिद्ध दांडीयात्रा काढली.

त्या वेळी 'उचललेस तू मीठ मूठभर, साम्राज्याचा खचला पाया' या ओळी सर्वतोमुखी झाल्या. पण आधुनिक काळात जास्त मीठ रिचवल्याने आरोग्याचा खचला पाया असे म्हणण्याची वेळ आली आहे. मिठाशिवाय माणसाचं जगणं आळणी आणि मिळमिळीत आहे, सगळं बेचव आहे, हे तर खरेच.पण ते प्रमाणाबाहेर गेले की धोकादायक ठरते. मिठाचे हे आख्यान मांडायचे कारण म्हणजे, जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) जगातील तमाम जनतेला 'मीठ जरा जपूनच खा', जेवणातून ते शक्य तितके कमीच करा, असा धोशा लावला आहे.

दैनंदिन आहारातील मीठ तीस टक्क्यांनी कमी करण्याचा निर्धार २०१३मध्ये करण्यात आला होता. हे उद्दिष्ट २०२५पर्यंत पूर्ण व्हावे, असे ठरले होते. तथापि, त्या दिशेने जगभरातील हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच देशांनी पावले उचलली. यामध्ये ब्राझील, चिली, चेक प्रजासत्ताक, उरुग्वे, सौदी अरेबिया, स्पेन, मेक्सिको अशा निवडक देशांचा समावेश होतो.मात्र, भारतासह बहुतांश देशांनी त्या दृष्टीने भरीव आणि ठोस पावले उचलली नाहीत. मिठाच्या वापराबाबत जनजागृती आणि त्यासाठी अन्नपदार्थ उत्पादकांना मार्गदर्शक सूचना करण्याबाबत या देशांच्या शासनसंस्थांनी मिठाची गुळणीच घेतलेली आहे. धोरणात्मक ठोस कार्यवाही केलेली नाही, ही खेदाची बाब आहे.काही दशकांमधील वेगवान औद्योगिकीकरण, अन्नप्रक्रिया उद्योगांचा विस्तार, जागतिकीकरण, पोटापाण्यासाठी घरदार सोडून इतरत्र जाणे आणि अन्य स्थित्यंतरांमुळे आपल्या जीवनशैलीत आणि खानपान पद्धतीत आमूलाग्र बदल झाला आहे. बैठी जीवनशैली वाढल्याने आरोग्यविषयक नवनव्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.आहारातील वाढलेल्या मिठामुळे हृदयविकार, रक्तवाहिन्यांचे विकार, आजार, पक्षघात, मूत्रपिंड तसेच इतर आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. प्रदुषणापासून इतरही कारणे यामागे आहेत. पण याचे मुख्य कारण घरच्या रुचकर, ताज्या अन्नापेक्षा पॅकेज्ड, प्रोसेस्ड फूडची नको इतकी लागलेली गोडी आणि असलेली क्रेझ. फास्टफूडची भुरळ सातत्याने वाढतच आहे.

भूमिका

गणित बिघडवणारा पाऊस

मान्सूनचा मोसम संपला असा सार्वत्रिक समज झाला असताना सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यातील संततधार पावसाने बड्या शहरांतील पायाभूत सुविधांना आणि पावसाअभावी सिंचनाच्या आधाराने उभ्या राहिलेल्या पिकांना तडाखा देत उत्तर भारताचे आर्थिक गणित बिघडवले आहे.

यंदा उत्तर भारतातील लोकांच्या वाट्याला पावसाळ्यातील 'अच्छे दिन' आलेच नाहीत. जूनपासून सप्टेंबरच्या मध्यापर्यंत उन्हाळा आणि उकाड्याने शहरी भागातील जनतेला त्रस्त केले. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत पावसाने दडी मारल्यामुळे पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान या राज्यांतील अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळसदृश स्थिती निर्माण झाली. मान्सूनचा मोसम संपला असा सार्वत्रिक समज झाला असताना सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यातील संततधार पावसाने बड्या शहरांतील पायाभूत सुविधांना आणि पावसाअभावी सिंचनाच्या आधाराने उभ्या राहिलेल्या पिकांना तडाखा देत उत्तर भारताचे आर्थिक गणित बिघडवले आहे.

हवामानाचा अचूक अंदाज ग्रामीण भागात जेवढा शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरतो, तेवढाच तो शहरी भागात महापालिका प्रशासनातील भ्रष्टांसाठीही मार्गदर्शक ठरत असतो. पाऊस पडणार नसेल तर त्यांना नालेसफाईसारखी कामे कागदोपत्री उरकून आपले उखळ पांढरे करून घेता येते. अवघ्या काही तासांच्या पावसामुळे बड्या-बड्या शहरांची लाज निघणे हा आता निसर्गाचा इव्हेंट झाला आहे. वरकरणी चकाचक दिसणाऱ्या पायाभूत सुविधांच्या अंतरंगात काय दडले आहे, हे दाखविण्यासाठी काही तासांचा मुसळधार पाऊस पुरेसा ठरतो. बंगळुरूपाठोपाठ राष्ट्रीय राजधानी परिसरातील दिल्ली, गुरुग्राम, नोइडा, गाझियाबाद, फरिदाबादसह प्रमुख शहरांमध्ये बेमोसमी पावसाने शहरी नियोजनाचे वस्त्रहरण केले. पण महापालिकांमधील भ्रष्ट अधिकाऱ्यांची शरम ओसरलेल्या पावसाच्या पाण्यासोबत एक-दोन दिवसांतच विरून गेली. करोना संकटाच्या काळात रूढ झालेली 'वर्क फ्रॉम होम'ची संकल्पना उपयुक्त ठरल्यामुळे अशा

आकस्मिक नैसर्गिक संकटांचा सरकारी वा खासगी क्षेत्राच्या कामकाजावर फारसा प्रतिकूल परिणाम होत नाही. त्यामुळे नागरी सुविधांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असलेले महापालिकांच्या प्रशासन आणखीच सोकावते. त्याची किंमत सर्वसामान्यांना चुकवावी लागते. इंडिया गेट ते राष्ट्रपती भवनादरम्यानच्या 'कर्तव्यपथा'ची जाणीव पावसामुळे भ्रष्टाचाराचे पितळ उघडे करणाऱ्या रस्त्यांनाही करून देणे क्रमप्राप्त ठरले आहे. सप्टेंबर महिन्यात उत्तर भारतात माफक प्रमाणात होणारा पाऊस हा पिकांसाठी पोषक आणि हिवाळ्याची चाहूल देणारा असतो. पण यंदा परतीच्या मान्सूनने निर्माण केलेला क्षणिक गारवा फसवा आणि मोठी किंमत वसूल करणारा ठरणार आहे. दिल्लीसह उत्तर भारताला पावसाळाभर असह्य अशा उष्ण आणि दमट हवामानाचा सामना करावा लागला. मग इतक्या महिन्यांची पर्जन्यवृष्टीची तूट काही दिवसांत भरुन निघाली. त्यामुळे तापमान १० अंश सेल्सिअसने घटले असले तरी ऑक्टोबर महिन्यात निसर्गाचा जीएसटी लागून तापमान पुन्हा ३२-३३ अंश सेल्सिअसवर जाणार आहे. शिवाय कापणीस तयार झालेल्या उभ्या पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले आहे.

या बेमोसमी पावसापूर्वीच खरिपाच्या मोसमातील धान्य उत्पादनात सुमारे ७० लाख टनांची घट अपेक्षित होती. खरीपाच्या धान्य उत्पादनात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या धानाच्या पेरणीखालचे क्षेत्रफळ यंदा ५.६ टक्क्यांनी घटले. त्यापाठोपाठ जून ते सप्टेंबरच्या मध्यापर्यंत पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेशसारख्या राज्यांमध्ये पावसाने दडी मारल्यामुळे गेल्या वर्षी खरिपात झालेल्या १५.६ कोटी टन धान्य उत्पादनात ६१ लाख टनांची घट होईल; तसेच मागच्या खरीप मोसमात झालेले ११.१७ कोटी टन धानाचे उत्पादन १०.५० कोटी टनांवर येईल, असा सुधारित अंदाज मोदी सरकारला जाहीर करावा लागला. आता त्यात उत्तर भारतातील अनेक जिल्ह्यांमध्ये कापणीसाठी तयार झालेले धानाचे पीक झोपविणाऱ्या पावसाची भर पडली आहे.

प्लास्टिकबंदी होणार कशी?

प्रदूषण नियंत्रण मंडळाने एक जुलैपासून सिंगल-युज प्लास्टिकच्या विक्री व वापरावर बंदी घातली आहे. कठोर कारवाईचा इशाराही दिला आहे. परंतु जोपर्यंत सामान्य नागरिक जागे होत नाहीत, तोवर ही मोहीम यशस्वी कशी होणार?

सकाळी चालायला जाऊन येताना दूध आणण्यासाठी किटली सांभाळत चालून झाल्यावर आम्ही दुकानात शिरलो. तिथे मंडळी प्लास्टिकच्या पिशवीमधून दूध, दही घेऊन जात होती. एक शाळकरी मुलगा सायकलवरून आला होता. त्याला म्हटले, 'दूध प्लास्टिकच्या पिशवीतून नेणार? काही आणलं का नाहीस?' त्यावर त्यानं खिशातून पिशवी काढून दाखवली आणि म्हणाला ही कापडी पिशवी आणली आहे ना! मग प्लास्टिकची पिशवी त्या पिशवीत टाकून हसत निघून गेला. दूधवाल्याकडे त्याचा घरोघर दुधाचा रतीब घालणारा माणूस मोठी किटली घेऊन निघत होता. त्या किटलीतही नुसते दूध आणि माप नव्हते तर प्लास्टिकच्या पिशवीत ग्राहकाच्या रतीबानुसार दूध मोजून त्या पिशव्याच भरलेल्या होत्या. म्हणजे घरपोच दूध देऊनही प्लास्टिक वाचणार नव्हतेच. भाजी, फळवाल्याकडे गेल्यावर एका हातानं प्लॅस्टिकची पिशवी बाहेर काढूनच

भाव सांगतात. कशाला देता पिशवी, असे विचारल्यावर 'पिशवी दिली नाही तर गिऱ्हाईक जाते,' असे उत्तर मिळते. प्लास्टिक टाळण्याचे उपाय करण्याचा आळस आहे तोपर्यंत यात बदल होणार नाही. देशामध्ये प्लास्टिक बंदीसाठी सरकारकडून पावले उचलली जात आहेत. पण अजूनही प्लास्टिकचा वापर होतो. अशामध्ये केंद्र सरकारने देशात सिंगल यूज प्लास्टिकविरोधात कृती आराखडा तयार केला. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने एकेरी वापराच्या प्लास्टिकवर बंदी घालण्यासाठी कठोर नियम केले आहेत. एक जुलैपासून जर कोणी सिंगल-युज प्लास्टिक विकले किंवा या प्लास्टिकचा वापर केला तर कठोर कारवाई होणार आहे. अर्थात, नुसता नियम करून अनेकदा दंड वसूल करणाऱ्यांना फायदा होतो. पळवाटा काढल्या जातात. खरं तर हा वापर टाळता येऊ शकतो. भाजी, दूध, दही, तूप हे पदार्थ काही अचानक आठवून आणले जात नाहीत. मग सोबत बरणी, किटली, डबा, भाजीसाठी कापडी पिशवी ठेवायला काय हरकत आहे?खरे तर प्लास्टिकमधून दूध किंवा दही वा इतर काही आणण्याची लाज वाटायला हवी. प्लास्टिकचा पर्यावरणावर अनिष्ट परिणाम होतो. वन्यजीव, समुद्रीजीव धोक्यात येत आहेत. खराब न होणारे, विघटन न होणारे प्लास्टिक आता त्याच्या याच वैशिष्ट्यांमुळेच वरदान न ठरता शाप ठरत आहे. प्लास्टिक टाकायचे कुठे आणि त्याची विल्हेवाट लावायची कशी, ही समस्या जगभर चर्चिली जात आहे. प्लास्टिक उद्योगातून लक्षावधी लोकांना रोजगार मिळाला.

।। अभंगवाणी ।।

तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ।।१।।
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ।।ध्रु.।।

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

वाशीम जिल्ह्यातील काही भागात गारपिटीचा तडाखा!

» फळबागांचे नुकसान, अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित

। वाशीम । महाईन्यूज ।

वाशीम काल सायंकाळपासून जिल्ह्यातील बहुतांश भागात हलका आणि मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. मात्र, १७ मार्च रोजी सायंकाळी वाशीम तालुक्यातील वाई वारला तर मालेगाव तालुक्यातील पांगरा बंदी शेतशिवारात विजेच्या कडकडाटासह गारपीट झाली. तर काही भागात कमी जास्त प्रमाणात पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या वादळी पावसामुळे जिल्ह्यातील फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

मालेगाव तालुक्यातील पांगराबंदी शेत शिवारात जोरदार गारपीट झाली. या वादळी वाऱ्यामुळे फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे तसेच इतर पिकांचे देखील नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. गत दोन दिवसापासून जिल्ह्यातील बहुतांश भागात ढगाळ वातावरण आणि पावसाची रिपरिप सुरू असून आज जिल्ह्यातील बहुतांश भागात विजेच्या कडकडाटासह गारपीट झाल्याने विविध भागातील विविध पुरवठाही खंडित झाला होता. मालेगाव तालुक्यातील पांगराबंदी शेत शिवारात अचानक झालेल्या गारपीट आणि वादळी पावसामुळे शेतातील गहू, कांदा, टोमॅटो, लिंबू, तसेच फळबागाचे मोठे नुकसान झाले.

विद्युत पुरवठाही खंडित

» दोन दिवसापासून जिल्ह्यातील बहुतांश भागात ढगाळ वातावरण आणि पावसाची रिपरिप सुरू असून आज जिल्ह्यातील बहुतांश भागात विजेच्या कडकडाटासह गारपीट झाल्याने विविध भागातील विविध पुरवठाही खंडित झाला होता.

सर्व मागण्या मान्य करतो, आता लाँगमार्च थांबवा!

मुख्यमंत्र्यांचं गावितांना आवाहन

। मुंबई । महाईन्यूज ।

शेतकरी, कष्टकरी, अंगणवाडी सेविका यांचा एक लाँगमार्च मुंबईच्या दिशेने येत आहे. त्यांच्या शिष्टमंडळाने नुकतंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. आज सभागृहात बोलतांना मुख्यमंत्र्यांनी सर्व मागण्या मान्य असल्याचं म्हटलं असून मार्च मागे घेण्याची विनंती केली आहे.

शेतकऱ्यांचा मार्च ठाण्यामध्ये दाखल झालेला आहे. शिष्टमंडळासमोब मुख्यमंत्र्यांनी चर्चदिखील केली. मुख्यमंत्री सभागृहात बोलतांना म्हणाले की, कांद्याला ३०० ऐवजी ३५० रुपये अनुदान देण्यात येईल. तसेच आंदोलकांच्या बहूतांश मागण्या मान्य आहेत. त्यामुळे गावित यांनी लाँग मार्च थांबवावा, अशी विनंती एकनाथ शिंदे यांनी केली. दरम्यान, शेतकरी, कामगार, अंगणवाडी सेविका यांच्या मागण्यांसाबबत एक समिती गठीत करण्यात आलेली असून महिन्याभरात समितीने अहवाल द्यावा, असं मुख्यमंत्री म्हणाले. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य असून मार्च थांबवण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं आहे.

सोमवारपर्यंत जिथे आहे तिथेच थांबू, असा निर्णय मोर्चेकऱ्यांनी घेतला होता. मुख्यमंत्र्यांनी सभागृहात निवेदन सादर करावं, अशीही मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली होती. आता मुख्यमंत्र्यांनी निवेदन सादर केलं असून मोर्चेकरी काय निर्णय घेतात, हे पाहावं लागेल.

सरकारवर अजित पवारांचे शरसंधान

। मुंबई। महाईन्यूज ।

राज्य सरकार कोट्यवधी रुपयांच्या योजना महापालिकांवर लादत असून जनतेच्या करातून मिळालेल्या पैशाची सुशोभीकरण आणि जाहिरातींवर उधळपट्टी सुरू असल्याचा आरोप करीत विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी शुक्रवारी राज्य सरकारच्या कारभारावर शरसंधान साधले.

निवडणुकीच्या तोंडावर मुंबई महानगरपालिकेच्या पैशांवर कितीही कामे सुरु करा. मुंबईकर निवडणुकीत एक -एक पैशाचा हिशेब तुमच्याकडून घेतील, हे मात्र विसरू नका, असा इशाराही अजित पवार यांनी दिला.

विरोधी पक्षांच्या नियम २९३ अन्वये अजित पवार यांनी, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण या विभागांसंदर्भात विधानसभेत प्रस्ताव मांडला. अजित पवारांनी नगरविकास विभागाला लक्ष केले होते.

विशेष करून मुंबई महापालिकेमध्ये प्रशासकांच्या माध्यमातून सुरू असलेल्या हस्तक्षेपावरून त्यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केले. प्रशासकांच्या माध्यमातून सुरु असलेला राज्य सरकारचा हस्तक्षेप तत्काळ थांबला पाहिजे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासनिधीतून मुख्यमंत्र्यांच्या जाहिरातींवर होत असलेली उधळपट्टी थांबली पाहिजे. आम्ही केलेल्या कामांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करून काहीही फरक पडणार नसल्याचा टोला त्यांनी सरकारला मारला.

शेतकरी प्रश्नांवरुन विरोधक आक्रमक

» विधीमंडळाच्या पायऱ्यावर सरकारविरोधात घोषणाबाजी

। मुंबई । महाईन्यूज ।

सध्या राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन (सुरू आहे. या अधिवेशनाचा तिसऱ्या आठवड्यातील आज (17 मार्च) शेवटचा दिवस आहे. आजच्या दिवशीही विरोधक आक्रमक झाले आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नावरुन विरोधकांनी विधीमंडळाच्या पायऱ्यावर आजही आंदोलन सुरु केलं आहे. 'खोके सरकारचा उपयोग काय शेतकऱ्यांना न्याय नाय' अशा घोषणा विरोधक देत आहेत.

अवकाळी पावसामुळं शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांची उभी पिकं वाया गेली आहेत. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरकारनं तात्काळ मदत करावी अशी मागणी विरोधकांनी केली आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार राज्याच्या विविध भागात अवकाळी पाऊस पडत आहे. तर काही ठिकाणी गारपीट देखील झाली आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. यासंदर्भात विधानसभेत अजित पवारांनी प्रश्न उपस्थित केला. अर्थसंकल्पीय अधिवेशनचा तिसरा आठवडा सुरु आहे. आजही विरोधक आक्रमक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. शेतकऱ्यांच्या मुद्यावरुन विरोधकांनी सभागृहाच्या पायऱ्यावर घोषणाबाजी केली.

अवकाळीमुळं शेती पिकांचं मोठं नुकसान

» नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर, मुदखेड तालुक्यात सायंकाळी जोरदार गारपीट झाली. गारपिटीमुळे रब्बी पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. बारड येथे घर कोसळून एकाचा मृत्यू झाला आहे. अर्धापूर तालुक्यातील आंबेगाव, चनापूर, पाटणूर परिसरात वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. वादळी वाऱ्यामुळे झाडे उन्मळून पडली आहेत. केळीच्या बागांना मोठा फटाका बसला. वीजवितरण कंपनीचे विद्युत खांब, तारा तुटल्याने वीज पुरवठा खंडित झाला. हरभरा, गहू आंबा आदी पिकांना फटका बसल्याने शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. मुदखेड तालुक्यात वादळी पाऊस आणि गारपीट झाली. यामध्ये शेतीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. नांदेड-मुदखेड मार्गावर काही ठिकाणी झाडे पडली आहेत. हदगाव तालुक्यालाही वादळी पावसाचा तडाखा बसला. नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्याचबरोबर सोलापूर, हिंगोली, जालना, रयगड या जिल्ह्यांमध्ये देखील अवकाळी पाऊस, झाला आहे. या पावसात शेती पिकांचं मोठं नुकसान झालं आहे.

ममता-अखिलेश यादव यांनी स्थापन केली नवी आघाडी !

केंद्रातील 3 प्रमुख विरोधी पक्षांनी काँग्रेसपासून ठेवला दुरावा

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

केंद्रातील तीन प्रमुख विरोधी पक्षांनी भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांपासून स्वत:ला दूर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच केंद्रातील दोन्ही राजकीय पक्ष आपल्याला समान वागणूक देतील असे संकेत दिले आहेत.

समाजवादी पक्षाचे सर्वेसर्वा अखिलेश यादव यांनी कोलकात्यात तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी यांची भेट घेतल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी पुढील आठवड्यात ओडिशाचे मुख्यमंत्री आणि बिजू जनता दलाचे प्रमुख नवीन पटनायक यांची ही भेट घेणार आहेत.

दुसरीकडे तृणमूल काँग्रेसचे खासदार सुदीप बंदोपाध्याय यांनी म्हटलं की, "राहुल गांधी यांनी परदेशात केलेल्या वक्तव्यावरून भाजप आक्रमक आहे. जोपर्यंत राहुल माफी मागत नाहीत तोपर्यंत भाजप संसदेचे कामकाज चालू देणार नाही. याचा अर्थ त्यांना काँग्रेसचा वापर करून संसद चालू द्यायची नाही.

राहुल गांधी यांनी विरोधी पक्षाचा चेहरा व्हावा, अशी भाजपची इच्छा आहे. जेणेकरून त्याचा फायदा भाजपला होईल, असंही ते म्हणाले.काँग्रेस हा विरोधकांचा 'बिग बॉस' आहे, असे वाटणे हा भाजपचा भ्रम आहे. मुख्यमंत्री ममता बनर्जी 23 मार्चला नवीन पटनायक यांची भेट घेणार आहेत. आम्ही इतर विरोधी पक्षांशी (भाजप आणि काँग्रेसपासून समान अंतर ठेवण्याच्या योजनेवर) चर्चा करू. ही तिसरी आघाडी आहे असे आम्ही म्हणत नाही, पण भाजपला टक्कर देण्याची ताकद प्रादेशिक पक्षांमध्ये आहे, असही बंदोपाध्याय म्हणाले.

भाजप, काँग्रेस एका माळेचे मणी; अखिलेश यादव

» भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस हे एका माळेचे मणी आहेत. आमच्या पक्षाची विचारसरणी मात्र वेगळी आहे, असे वक्तव्य समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी केले.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेला पुन्हा प्रारंभ होत आहे. तीन जानेवारी रोजी दिल्लीनंतर उत्तर प्रदेशचा टप्पा सुरु होणार आहे. त्यासाठी आमंत्रण मिळाले आहे का, या प्रश्नावर अखिलेश म्हणाले की, 'विरोधी पक्षांच्या युतीला चालना देणारा बिंदू ठरण्याची शक्यता काँग्रेसच्या यात्रेने संपुष्टात आणली आहे.'

'तुमच्या फोनवर आमंत्रण आले असेल तर कृपया मला ते पाठवा,' अशी टिप्पणीही त्यांनी पत्रकारांना उद्देशून केली. यात्रेसाठी आमच्या भावना आहेत, पण मला आमंत्रण मिळाले नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

काँग्रेसच्या सूत्रांनी मात्र अखिलेशच नव्हे तर युत्तर प्रदेशमधील बसपच्या प्रमुख मायावती यांनाही आमंत्रण दिल्याचा दावा केला आहे. अखिलेश, मायावती यांच्यासह सपचा मित्रपक्ष राष्ट्रीय लोक दलाचे (रालोद) प्रमुख जयंत चौधरी यांनीही यात्रेत सहभागी होण्याची शक्यता फेटाळून लावली आहे.

सप आणि काँग्रेस यांच्या युतीला २०१७ मध्ये दारुण अपयश आले. त्यानंतर ही युती या वर्षातील निवडणुकीपूर्वी संपुष्टात आली. काँग्रेसला केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले, तर सपने १११ जागांपर्यंत मजल मारली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध भक्कम आव्हान निर्माण करायचे असल्यास काँग्रेसला मित्रपक्षाची गरज लागू शकते.

राहुलविरोधी घोषणाबाजीमुळे संसदेचे कामकाज ठप्प

भाजपने शुक्रवारी काँग्रेसला संसदेच्या दोन्ही सदनांमध्ये घेरले

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

राहुल गांधींनी माफी मागितल्याशिवाय त्यांना सभागृहात बोलू न देण्याची रणनिती आखत भाजपने शुक्रवारी काँग्रेसला संसदेच्या दोन्ही सदनांमध्ये घेरले. लोकसभेत राहुल गांधींच्या उपस्थितीत सत्ताधारी पक्षाचे सदस्य अत्यंत आक्रमक होऊन घोषणाबाजी करत होते. राज्यसभेतही हाच गदारोळ सुरू राहिला. भाजपच्या उग्र 'आंदोलना'मुळे अवघ्या २० मिनिटांमध्ये दोन्ही सदनांचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब केले गेले.

लंडनमध्ये देशविरोधी विधाने केल्याबद्दल काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधींचे लोकसभेतील सदस्यत्व रद्द करण्याची मागणी भाजपचे लोकसभेतील खासदार निशिकांत दुबे यांनी केली आहे. परदेशात जाऊन थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर राहुल गांधी यांनी हल्लाबोल केल्याने संतप्त झालेल्या भाजपने वायनाडच्या खासदाराच्या हकालपट्टीसाठी हालचाली सुरू केल्या आहेत. त्यामुळे शुक्रवारी संसदेमध्ये रणकंदन माजणार हे स्पष्ट झाले होते. लोकसभेमध्ये भाजपच्या सदस्यांनी राहुल गांधींच्या माफीच्या मागणीसाठी तर, काँग्रेसच्या खासदारांनी अदानींच्या चौकशीची मागणीसाठी सभागृहात टिपेचा आवाज लावला. लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी दोन्ही बाजूच्या सदस्यांना शांत होण्यासाठी वेळ देऊनही गदारोळ थांबला नाही. 'सभागृहातील आरडाआरडा थांबला तर मी प्रत्येकाला बोलण्याची संधी देईन', असे बिर्ला म्हणाले.

मंत्र्यांच्या मूक पाठिंबा

काँग्रेसचे सदस्य अध्यक्षांच्या समोरील मोकळ्या जागेत येऊन घोषणा देत होते. यावेळी राहुल गांधी व सोनिया गांधी हे दोघेही सभागृहात उपस्थित होते. सत्ताधाऱ्यांकडून केंद्रीय मंत्र्यांची फौज सदनात तैनात केली गेली होती. सभागृहाचे उपनेते राजनाथ सिंह, नितीन गडकरी, एस. जयशंकर, अनुराग ठाकूर, प्रल्हाद जोशींसह बहुतांश केंद्रीय मंत्री भाजपच्या सदस्यांच्या घोषणाबाजीला मूक पाठिंबा देत होते.

सभागृहातील 'आवाज बंद'

» लोकसभेत दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या आरोप-प्रत्यारोपामुळे कांठळ्या बसत असताना, संसद टीव्हीवरील थेट प्रक्षेपणाचा ध्वनी मात्र बंद केला गेला. फक्त लोकसभाध्यक्षांचे तहकुबीपूर्वीचे विधान प्रेक्षकांना ऐकता आले. लोकसभा सचिवालयाच्या या कृतीचा काँग्रेसने तीव्र शब्दांत निषेध केला. 'आधी माइक बंद केला जात होता, आता सदनातील करवाईचा आवाजही बंद होऊ लागला आहे. पंतप्रधान मोदींच्या मित्रासाठी सदनातील प्रक्षेपणाचा ध्वनी गायब केला गेला', अशी उपरोधिक टिप्पणी काँग्रेसने ट्वीटद्वारे केली.

विरोधकांचे धरणे

»कामकाज तहकूब झाल्यानंतर काँग्रेससह विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेच्या आवारातील महात्मा गांधींच्या पुतळ्यासमोर ठिय्या आंदोलन केले. अदानी समूहाच्या कथित गैरव्यवहारांची संयुक्त संसदीय समितीकडून चौकशी झालीच पाहिजे, अशी घोषणाबाजी विरोधक करत होते. काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, पक्षाच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी तसेच, राहुल गांधीही आंदोलनात सामील झाले. अदानीच्या मुद्द्यावरून तृणमूल काँग्रेसने वेगळी चूल केली असली तरी, या पक्षाचे खासदारही इतर नेत्यांसह घोषणाबाजीत सहभागी झालेले दिसले.

अय जरा दमानं...!' विमानतळावर जे घडलं त्यावरुन मलायका चाहत्यावर चिडली

मलायकाच्या बाबत कधी काय होईल हे सांगता येत नाही. बॉलीवूडमधील सगळ्यात जास्तवेळ सोशलमीडियावर चर्चेत राहणारी ती सेलिब्रेटी आहे. भलेही मलायका कोणत्या चित्रपटांमध्ये प्रमुख अभिनेत्री म्हणून दिसली नसली तरी सोशल मीडियावर मात्र ती नेहमीच स्टार राहिली आहे.

मलायकाचा चाहतावर्ग मोठा आहे. तिला इंस्टावर फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. मलायकानं तिची चाळीशी केव्हाच पार केली आहे. पण तिच्या सौंदर्यात तिचं वय कधीच आड येत नाही. हे तिच्या बोल्ड फोटोंकडे पाहिल्यावर आणि त्याला चाहत्यांनी दिलेल्या कमेंटसवरुन दिसून येते. मलायकाचा एक दिवस असा जात नसेल की ती कोणत्या ना कोणत्या कारणावरुन चर्चेत येत नाही... आताही तिच्या एका व्हिडिओनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.पापाराझ्झी हे नेहमीच मलायकाचे फोटो आणि व्हिडिओ घेण्यासाठी उत्सुक असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे अनेकदा मलायकाचा संताप होत असतो. काही दिवसांपूर्वी मलायकाच्या आयुष्यावर आधारित मुव्हिंग विथ मलायकाचा नावाची मालिका प्रदर्शित झाली होती. त्यामध्ये मलायकानं पापाराझ्झी आणि तिच्याबाबत होणारं ट्रोलिंग याविषयी सांगितलं होतं. आता विमानतळावर जे काही घडलं त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेताना दिसतो आहे.

मलायका मुंबई विमानतळावर आली. त्यानंतर तिला पाहण्यासाठी चाहत्यांनी एकच गर्दी केली. त्यातील अनेकांना मलायकासोबत फोटो काढायचा होता. मात्र त्याला मलायकानं हरकत घेतली. याचवेळी तिच्या काही चाहत्यांचा ग्रुप फोटो काढण्यासाठी गेला. त्यांच्यात थोडी धक्काबुक्की झाली.आणि मलायकानं चाहत्यांना जरा संयमानं वागण्यास सांगितले. त्यानंतर तिच्या त्या व्हिडिओवर आलेल्या प्रतिक्रिया भन्नाट आहे.

लग्नाला 10 वर्षे उलटल्यानंतर रितेश देशमुखने केला खुलासा

बॉलिवूडमधील 'क्यूट कपल' म्हणून जिनिलीया आणि रितेश देशमुख यांच्याकडे पाहिले जाते. गेल्या काही दिवसांपासून रितेश आणि जिनिलीया यांचा वेड या चित्रपटाची चांगली चर्चा सुरु होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर कोट्यावधी रुपयांचा गल्ला जमवला होता. नुकतंच रितेश देशमुखने त्याच्या सुखी संसाराचे गुपित सांगितले आहे.

रितेश आणि जिनिलीया हे दोघेही झी चित्र गौरव पुरस्कार सोहळ्यात सहभागी झाले होते. याचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओत अभिनेता श्रेयस तळपदे हा रितेशला त्याच्या संसारबद्दल प्रश्न विचारताना दिसत आहे.सुखी संसाराचे रहस्य काय?" असा प्रश्न श्रेयस रितेशला विचारतो. त्यावर "माणसाने चूक आपलीच आहे हे लवकर कबूल केलं पाहिजे", असे रितेश गंमतीत म्हणतो. त्यानंतर श्रेयस हा 'रितेश देशमुख हे त्यांच्या पत्नीला घाबरतात', असे ओरडताना दिसतो. त्यांचा हा व्हिडीओ झी मराठीने शेअर केला आहे. यात श्रेयस आणि रितेशची ऑनस्क्रीन सुरु असलेली मजामस्तीही पाहायला मिळत आहे.

रितेश आणि जिनेलियाने २००३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'तुझे मेरी कसम' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. ९ वर्षे रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर २०१२ मध्ये त्यांनी लग्न केले. यंदाच्या वर्षी त्यांच्या लग्नाला ९ वर्षे झाली आहेत. जिनेलियाला खरी लोकप्रियता ही २००८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जाने तू या जाने ना' या चित्रपटातून मिळाली. जिनेलियाने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतही काम केले आहे. त्यांना दोन मुलं असून रियान आणि राहिल अशी त्यांची नावं आहेत.

'द एलिफंट व्हिस्परर्स'च्या निर्मात्या गुनीत मोंगा यांनी व्यक्ती केली नाराजी

भारताला यंदाच्या ऑस्कर सोहळ्यामध्ये दोन पुरस्कार मिळाले. 'नाटू नाटू' व 'द एलिफंट व्हिस्परर्स' यासाठी भारताने ऑस्कर जिंकले. 'द एलिफंट व्हिस्परर्स'ला बेस्ट डॉक्युमेंटरी शॉर्ट फिल्मचा ऑस्कर पुरस्कार मिळाला आहे. या लघुपटाच्या निर्मात्या गुनीत मोंगा यांची सध्या चांगलीच चर्चा आहे. नुकत्याच गुनीत मोंगा या ऑस्कर जिंकल्यावर भारतात परतल्या. तेव्हा थाटात त्यांचं स्वागत केलं गेलं आणि ते फोटोसुद्धा चांगलेच व्हायरल झाले.

गुनीत यांनी ऑस्कर जिंकल्याने साऱ्या भारतीयांचं उर अभिमानाने भरून आलं.

गुलाबी है समां..!

सोनाली कुलकर्णी

अभिनेत्री सोनाली कुलकर्णीने तिचे खास अंदाजातले फोटो पोस्ट केले आहेत. या फोटोंची चर्चा सोशल मीडियावर चांगलीच रंगली आहे. (सर्व फोटो सौजन्य-सोनाली कुलकर्णी-इंस्टाग्राम पेज)

सोनाली कायमच तिचे खास फोटो इंस्टाग्राम पेजवर पोस्ट करत असते. सोनालीचे हे खास अंदाजातले फोटो चांगलेच व्हायरल होत आहेत. सोशल मीडियावर सध्या सोनालीच्या या फोटोंची चर्चा आहे.

राहुलकडून ऑस्ट्रेलियाची धुलाई!

विराट-सुर्या फ्लॉप

।मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मुंबईच्या वानखेडे क्रिकेट स्टेडियमवर खेळलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला. या विजयासह मालिकेत भारताने 1-0 अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात के. एल. राहुलची खेळी भारतासाठी महत्वपूर्ण खेळी ठरली आहे. के. एल. राहुलने टीम इंडियाला कठीण परिस्थितीतून बाहेर काढून विजय मिळवून दिला.

राहुलने 73 चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले आणि रविंद्र जडेजासोबत निर्णायक भागिदारी करून भारताला विजयापर्यंत पोहोचवले. राहुलने 91 चेंडूत नाबाद 75 धावांची खेळी केली. यात त्याने सात चौकार आणि एक षटकार खेचला. गेल्या काही दिवसांपासून कठीण परिस्थितीतून जात असलेल्या राहुलच्या आजच्या खेळीचे जोरदार कौतुक केले जात आहे.

के.एल. राहुल बऱ्याच दिवसांपासून फॉर्मात नाही. तरी देखील त्याला अनेक वेळा संधी देण्यात आली. त्यामुळे त्याच्यासह निवड समितीवर देखील जोरदार टीका झाली. परंतु, आज भारताचे सलामीचे सर्व फलंदाज स्वस्तात बाद झाल्यानंतर केएल राहुलने संपूर्ण मॅच आपल्या खांद्यावर घेत एका बाजूने कडवी झुंज दिली. त्याला कर्णधार हार्दिक पांड्या आणि रविंद्र जडेजा यांनी मोलाची साथ दिली.

केएल राहुल भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावस्कर मालिकेतील पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्येही अपयशी ठरला. त्यामुळे त्याला उपकर्णधारपदावरून देखील हटवण्यात आले. माजी कर्णधार सौरव गांगुलीने देखील केएल राहुलवर टीका केली होती. "जेव्हा तुम्ही भारतात धावा करू शकत नाही, तेव्हा तुमच्यावर नक्कीच टीका होईल. यापूर्वीही अनेक खेळाडूंना अशा परिस्थितीचा सामना करावा लागला आहे. खेळाडूंवर खूप दडपण असते आणि त्यांच्याकडे खूप लक्ष दिले जाते. कारण तो संघासाठी महत्त्वाचा खेळाडू असल्याचे संघ व्यवस्थापनाला वाटते. तुमच्याबद्दल प्रशिक्षक आणि कर्णधाराचे मतही खूप महत्त्वाचे असते, असे गांगुली यांनी म्हटले होते. सोशल मीडियावरून देखील राहुलवर जोरदार टीका झाली आहे. परंतु, आजच्या महत्वपूर्ण सामन्यात केलेल्या धडाकेबाज खेळीने राहुलवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

ऑस्ट्रेलियाने दिलेल्या 188 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची सुरुवात निराशाजनक झाली. भारताचे आघाडीचे फलंदाज एकापाठोपाठ एक बाद होत गेले. अवघ्या 39 धावांत भारताने आघाडीचे चार फलंदाज गमावले होते. त्यानंतर हार्दिक पांड्या आणि केएल राहुल यांनी डाव सांभाळला.

क्रीडाविश्वात नाशिकच्या खेळाडूंचा डंका!

क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा शिवछत्रपती पुरस्काराने गौरव

।नाशिक ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

"नाशिकला लाभलेली निसर्गसंपदा आणि आरोग्यदायी वातावरणामुळे खेळाडूंसाठी निर्माण झालेल्या पोषक वातावरणाचा नाशिकच्या खेळाडूंनी योग्य वापर करून घेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळविला आहे. यात अर्जुन पुरस्कारविजेते आंतरराष्ट्रीय खेळाडू कविता राऊत, विदित गुजराथी, दत्तू भोकनळ, अंजना ठमके यांसारख्या नामांकित खेळाडूंनी नाशिकचे नाव अटकेपार पोचवले. अशा अनेक खेळाडूंना ज्यांनी घडविले असे ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक व संघटक (कै.) भीष्मराज बाम यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने शिवछत्रपती जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

त्याचबरोबर नाशिकच्या १२ क्रीडा संघटक, पाच मार्गदर्शक, तसेच क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विविध खेळाच्या ५० खेळाडूंचा महाराष्ट्र शासनाने आजवर शिवछत्रपती पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे. क्रीडाविश्वाला समृद्ध करणाऱ्या या खेळाडूंमुळेच नाशिकची ओळख आता क्रीडा नगरी म्हणूनही होत आहे."

नाशिकचा आपण ६० ते ६५ वर्षांपूर्वीचा काळ आठवला तर खेळाला फारसे महत्त्व दिले जात नव्हते. खेळाची आवड असली तरीही फारशा सुविधा नसल्यामुळे नागरिकांचा खेळाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन दुय्यम होता. तरीही नाशिकच्या खेळाडूंनी राष्ट्रीयस्तरावर आपले कौशल्य सिद्ध करून आपापल्या परीने नाशिकच्या लौकिकात भर घालण्याचा प्रयत्न केला.

या काळात नाशिकचा भौगोलिक विस्तार कमी असल्याने खेळांचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाही बोटावर मोजण्याइतक्याच होत्या. एखादा खेळाडू चांगली कामगिरी करीत असला तरी त्याला फारशी प्रसिद्धी मिळत नव्हती व सरकारी पातळीवरदेखील फारशी दखल घेतली जात नव्हती.

हार्दिक पंड्या भारतीय संघाचा कर्णधार

»नाशिकचा आपण ६० ते ६५ वर्षांपूर्वीचा काळ आठवला तर खेळाला फारसे महत्त्व दिले जात नव्हते. खेळाची आवड असली तरीही फारशा सुविधा नसल्यामुळे नागरिकांचा खेळाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन दुय्यम होता. तरीही नाशिकच्या खेळाडूंनी राष्ट्रीयस्तरावर आपले कौशल्य सिद्ध करून आपापल्या परीने नाशिकच्या लौकिकात भर घालण्याचा प्रयत्न केला.

आज ज्या प्रमाणात खेळाडूंना सरकारकडून सुविधा मिळतात तेवढ्या त्या काळात मिळत नव्हत्या. गुणवत्ता असूनही केवळ अर्थसहाय्य नसल्याने अनेक खेळाडू त्या काळात मागे पडत होते. ठराविक व्यायामशाळा आणि हायस्कूल ग्राउंड खेळासाठी उपलब्ध होते.

अशा परिस्थितीतही नाशिकच्या बापू नाडकर्णी यांनी क्रिकेटच्या इतिहासात नाशिकचे नाव अजरामर केले. बापू नाडकर्णीप्रमाणेच जिभाऊ जाधव यांनीही क्रिकेटमध्ये आपला ठसा उमटविला. त्याच काळात बापू नाडकर्णी यांचे बंधू छोटू नाडकर्णी यांनी टेबल टेनिस खेळात उत्कृष्ट कामगिरी करीत नाशिकच्या लौकिकात भर टाकली.